**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सहयाद्री सहकारी साखर कारखाना मर्यादित, यशवंतनगर, तालुका-कराड, जिल्हा - सातारा यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,५००.० टन/प्रतिदिन पासून १३,२००.० टन/प्रतिदिन पर्यंत, आसवणी प्रकल्प उत्पादन ४५.० किलोलिटर प्रतिदिन पासून १४५.० किलोलिटर प्रतिदिन (रेक्टिफाईड स्पिरिट/ एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल(ईएनए) /इथेनॉल) आणि नविन सहवीज निर्मिती प्रकल्प - २४.० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारणीसंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्ससहयाद्री सहकारी साखर कारखाना मर्यादित, यशवंतनगर, तालुका-कराड, जिल्हा - सातारा यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,५००.० टन/प्रतिदिन पासून १३,२००.० टन/प्रतिदिन पर्यंत, आसवणी प्रकल्प उत्पादन ४५.० किलोलिटर प्रतिदिन पासून १४५.० किलोलिटर प्रतिदिन (रेक्टिफाईड स्पिरिट / एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल(ईएनए) / इथेनॉल) आणि नविन सहवीज निर्मिती प्रकल्प - २४.० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीदिनांक १५ जून, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावरिल बैठक/परिषद सभागृहात आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-३१/२०१९ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी - १८७९,दिनांक ०७-०६-२०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) श्री सुनील थोरवे, - **अध्यक्ष**
अप्पर जिल्हादंडाधिकारी, सातारा
(मा. जिल्हादंडाधिकारी, सातारा यांचे प्रतिनिधी)

२) श्री दिलीप को. खेडकर, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे
(मप्रनि मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) श्री बाबासाहेब एम. कुकडे, - **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, सातारा

श्री बाबासाहेब कुकडे, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सातारा तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीयांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने, हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री कुकडे, समन्वयक यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्ससहयाद्री सहकारी साखर कारखाना मर्यादित, यशवंतनगर, तालुका-कराड, जिल्हा - सातारा यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,५००.० टन/प्रतिदिन पासून १३,२००.० टन/प्रतिदिन पर्यंत, आसवणी प्रकल्प उत्पादन ४५.० किलोलिटर प्रतिदिन पासून १४५.० किलोलिटर प्रतिदिन (रेक्टिफाईड स्पिरिट / एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल(ईएनए) / इथेनॉल) आणि नविन सहवीज निर्मिती प्रकल्प - २४.० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये सर्व उत्पादनांसाठी एकत्रित - **श्रेणीअ मध्ये**[साखर उत्पादनासाठी - ५ (जे), मळी आधारित आसवणी प्रकल्पासाठी - ५ (जी) व सहविद्युत प्रकल्पासाठी - १ (डी)] मोडत आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने, हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक ४ मे, २०१८ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक

कार्यालय, सातारा यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत वृत्तपत्रात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १५ मे, २०१९रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास् त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने, हवामान बदल मंत्रालय, नागपूर,मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सातारा, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सातारा , जिल्हा परिषद - सातारा, जिल्हा उद्योग केंद्र - सातारा, तालुका कार्यालय-कराड, जिल्हा - सातारा, ग्रामपंचायत, कार्यालये - यशवंतनगर, कोपर्डे हवेली, शहापूर, मसूर, शिरवडे, तासवडे, नडशी तालुका - कराड, जिल्हा - सातारा,मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सातारा, पर्यावरण विभाग, मंत्रालय - मुंबई व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत एकही आक्षेप स्थानिक मप्रनि कार्यालयास प्राप्त झालेला नाही. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना सांगितले की त्यांचे काही प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री कुकडे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

श्री सुनील थोरवे, अध्यक्ष, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या पर्यावरण सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिति शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिति सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजना माहिती देताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तक विविध पर्यावरण संरक्षण सयंत्रणेसाठी रुपये ५०/- कोटी खर्च करणार आहेत. त्यांनी सांगितले की प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. प्रकल्पातील हवा प्रदूषणाच्या संरक्षणासाठी अत्यंत आधुनिक अशी इलेक्ट्रो स्टॅटिक

प्रेसिपरेटर अशी सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार असून अप्रत्यक्षपणे भरपूर फायदा होणार आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले सदरहू प्रकल्प विस्तारिकरण कार्यरत प्रकल्प स्थानावरच करणार असल्याने विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिन व पाणीही लागणार नाही. ऊसामध्ये ७०% पाणी असते. उत्पादनप्रकियेत उत्पन्न् झालेले सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येणार आहे.

पर्यावरण सल्लागार यांच्या सादरीकरणानंतर श्री दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीसच ही जनसुनावणी का घ्यावी लागते याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आलेली आहे. ही जनसुनावणी घेण्याअगोदर प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाचा पर्यावरणीय अभ्यास केला जातो. त्यास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल म्हणतात. त्यात प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाची पर्यावरणाची सद्यस्थिती व प्रकल्पाच्या विस्तारिकरणामुळे पर्यावरणावर काही परिणाम होणार का याचा विचार व त्यावर उपाययोजना याचा अभ्यास केला जातो. पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणाव्दारे पर्यावरण व्यवस्थापन योजनांची माहिती दिलेली आहे. कारखान्याचे व स्थानिकांचे काही वेगळे प्रश्न असू शकतात. मात्र त्यासाठी वेगळे व्यासपीठ आहे. तरी बैठकीत प्रकल्पाच्या विस्तारीकरणामुळे काही पर्यावरणाच्या सूचना, आक्षेप वा टीकाटिप्पणी असल्यास त्या नोंदवाव्यात. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पुढे असे सांगितले की विस्तारिकरणामुळे पर्यावरणावर काही परिणाम होणार का किंवा स्थानिकांना त्याचा काही त्रास होणार का याबाबत आपली शंका असल्यास त्या मांडाव्यात. त्याचप्रमाणे सादरीकरणातील काही मुद्दे/बाबी याबाबत काही शंका/स्पष्टीकरण हवे असल्यास ते सांगावे. प्रकल्प सल्लागार त्याबाबत निराकरण करतील. येथे सर्वांना संधि आहे. प्रथम स्वतःचे नाव व गाव सांगावे व आपला प्रश्न मांडावा असे सांगितले.

खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतलाः-

१) <u>**श्री गोविंदराव कृष्णा थोरात, सरपंच, ग्रामपंचायत नडशी तालुका-कराड, जिल्हा-सातारा:-**</u>

- श्री गोविंदराव थोरात यांना माहिती दिली की सदरहू प्रकल्पाची ऊभारणी ही १९६९-१९७० साली झाली. त्यावेळेस गाळप क्षमता ही १२५० मे.टन/दिन होती. त्यावेळेपासूनच परिसरातील ऊस उत्पादनात वाढ होणे अपेक्षित

धरुन प्रकल्प प्रवर्तकांनी ऊसाच्या गाळप क्षमतेत वेळोवेळी विस्तारिकरण केलेले आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी वेळोवेळी ऊसाचा दरही वाढवून दिलेला आहे.

- श्री थोरात यांनी पुढे असे सांगितले की प्रकल्प प्रशासन पर्यावरणाची योग्यप्रकारे संवर्धन व समतोलराखत असून काळजी घेत आहे. परिसरातील द-याखो-यात प्रकल्प प्रवर्तक दरवेळी झाडे लावून हरितपट्टा विकसित करत असतात. तरी ऊस उत्पादक सभासद म्हणून प्रकल्पाच्या विस्तारिकरणास व नविन सहविद्युत निर्मिती प्रकल्पास शासनाने परवानगी द्यावी अशी विनंती त्यांनी केली.
- मा.अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या प्रकल्पाच्या विस्तारिकरणामुळे काही पर्यावरणविषयक सूचनाअसल्यास त्या उपस्थित करण्याची सूचना केली. इतर विषयाबाबत विचार व्यक्त करण्याचे हे व्यासपीठ नाही. काही माहिती पाहिजे असल्यास ती मागा, प्रकल्पाबाबत सूचना असल्यास त्या व्यक्त करा. प्रकल्पास अनुमोदन असल्यास तेवढेच सांगावे वा आक्षेप असल्यास तो नोंदवावा अशी सूचना केली.

२) **श्री दत्तात्रय तात्या शेलार, सामाजिक कार्यकर्ता, राहणार-शहापूर गाव, तालुका-कराड, जिल्हा-सातारा:-**

- श्री दत्तात्रय शेलार यांनी विचारणा केली की सदरहू विस्तारिकरणासाठी प्रकल्प प्रवर्तकांना अतिरिक्त जमिन लागणार काय? प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिन,पाणी लागणार नाही व विस्तारिकरण कार्यान्वित प्रकल्पाच्या जागेतच प्रस्तावित आहे. श्री शेलार यांनी असे मत मांडले की जर विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिन लागत नाही, तर विस्तारिकरणास पाठिंबा आहे.

३) **श्री शामराव दशरथ पवार, राहणार-वडोली निळेश्वर ,तालुका - कराड, जिल्हा-सातारा:-**

- परिसरातील जनतेची कारखान्यातील प्रदूषणाबाबत कोणतीही तक्रार नाही. प्रकल्पामुळेत्रास होत नाही. तरी कारखान्याने जी विस्तारिकरणाची मागणी केलेली आहे, त्यास आमचे अनुमोदन आहे, तरी प्रकल्पाच्या विस्तारिकरणास मान्यता देण्यात यावी.

४) **श्री रमेशबाबुराव जाधव, ग्रामपंचायत सदस्य,मसूर, ऊस उत्पादक सभासद, तालुका-कराड, जिल्हा-सातारा:-**

- श्री रमेश जाधव यांनी मत मांडले की कारखान्याच्या विस्तार वाढीसाठी व इथेनॉल प्रकल्प विस्तारवाढीसाठी प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात प्रकल्पामुळे प्रदूषणाचा कोणाताही त्रास होणार नाही याची दक्षता कारखान्याच्या प्रशासनाकडून घेतली जाते. प्रदूषण नियंत्रण मंडळाने घालून दिलेले नियम कारखाना प्रशासन पाळत आहे. प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळून कारखाना विस्तारिकरणास आमची अनुमती आहे.

५) **श्री नेताजी रामचंद्र चव्हाण, राहणार-कोपर्डे हवेली, तालुका-कराड, जिल्हा-साताराः-**

श्री नेताजी चव्हाण यांनी सांगितले की कारखान्याचा प्रदूषणाचा कोणाताही त्रास नाही. विस्तारिकरणास पाठिंबा देताना सांगितले कीशेतक-यांनाकारखान्यात ऊस देताना ब-याच अडचणी येतात. गाळपासाठी ऊस लवकर घ्यावा.

- प्रकल्प प्रवर्तकांच्या वतीने माहिती देण्यात आली की कारखान्यात ७,५०० मे.टन प्रति दिन ऊसाचे गाळप होते. गाळप १८० दिवस चालते. कारखान्यास २२,००० हेक्टर ऊसाची नोंद होते. त्यामुळे काही शेतक-यांना ऊस देताना थांबावे लागते. आता तसे होणार नाही.

६) **श्री शहाजीराव गणपतराव चव्हाण, राहणार-पेरलेगाव, तालुका-कराड, जिल्हा-साताराः-**

- श्री शहाजीराव चव्हाण यांनी मत मांडले की प्रकल्प प्रवर्तकांनी झिरो प्रदूषण तत्व लक्षात घेऊनच प्रकल्प तयार केले व राबवले. इतर कारखान्याबाबत ५-६ कि.मी. लांब वासाच्या प्रदूषणाचा त्रास होतो. नाकाला रुमाल लावावा लागतो. येथे कारखान्यात असतानाही वास येत नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य प्रदूषण प्रकल्प असणार आहे व सदरहू प्रकल्पा हा शून्य प्रदूषण प्रकल्प असण्याची काळजी कारखाना प्रशासन घेणार आहे. तरी सदरहू प्रकल्पास शासनाचे सहकार्य करावे ही विनंती.

७) **सौ. लीना निवासराव जाधव, उपसरपंच, यशवंतनगर ग्रामपंचायत, तालुका-कराड, जिल्हा-साताराः-**

- सौ. लीना जाधव यांनी प्रश्न विचारला की प्रस्तावित गाळप क्षमता वाढीसाठी प्रकल्पात नविन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे. तरी नविन बॉयलरमुळे संभाव्य हवा प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना योजणार आहेत,याबाबत खुलासा व्हावा.
- प्रकल्प सल्लागार यांनी माहिती दिली की हवा प्रदूषण नियंत्रणासाठी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर ही अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात

येणार असून सदरहू सयंत्रणा ९९.९%कार्यक्षमता (Efficiency) देते. त्यामुळे परिसरास हवा प्रदूषणाचा धोका नाही.

८) **श्री लक्ष्मण अंतूयादव, राहणार-उत्तर कोपर्डे, माजी सरपंच, उत्तर कोपर्डे ग्रामपंचायत, तालुका-कराड, जिल्हा-सातारा, सामाजिक कार्यकर्ताः-**

त्यांनी प्रश्न विचारला की प्रकल्प प्रशासनाने वाढीव गाळप क्षमतेबरोबरच आसवणी प्रकल्प विस्तारिकरण करण्याचे ठरविले आहे. मात्र विस्तारिकरणामुळे मळीचे प्रमाण, आकारमान वाढणार काय व त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

- प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की सदरहू इथेनॉल प्रकल्प आहे. ऑईल कंपन्या इथेनॉल विकत घेतात. विक्रीच्या दृष्टीने काहीही अडचण येणार नाही. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी विस्तारिकरणामुळे स्पेटवॉश मध्ये किती प्रमाणात वाढ होईल असा प्रश्न संबंधित व्यक्तीस विचारायचा आहे असा खुलासा केला. त्यास प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की द्रवरुपातील स्पेटवॉश हे घनरुपात करण्यात येईल.ते बॉयलरमध्ये जाळण्यात येईल. त्यामुळे मळी/स्पेंट वॉश झिरो प्रकल्प राहिल. त्याचप्रमाणे. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःसारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प आहे.

९) **श्री शंकरराव खापे माजी सरपंच, बनवडी गाव, तालुका-कराड, जिल्हा-सातारा, सामाजिक कार्यकर्ताः-**

- प्रकल्प सभासदांनी वार्षिक सभेत प्रकल्पातील गाळप क्षमता वाढविण्याची मागणी केलेली आहे. मात्र विस्तारिकरणामुळे सेंद्रिय व कंपोस्ट खताची वाढ होईल काय?कारण दरवर्षी शेतक-यांची कंपोस्ट व सेंदीय खताची मागणी असते. ती अपुरी पडते.
- प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की, सेंद्रीय खतात विस्तारिकरणामुळे वाढ होईल. सदरहू आसवणी प्रकल्प हा २७० दिवस कार्यान्वित राहणार आहे. त्यामुळे कंपोस्ट खततही निश्चितच जवळजवळ दिडपट वाढ होईल.

१०) **श्री उत्तमराव कृष्णा यादव,राहणार-वनवासमाची, जिल्हा-सातारा,सामाजिक कार्यकर्ता-**

- श्री उत्तमराव यादव यांनी प्रकल्प विस्तारिकरणामुळे उत्पन्न होणा-या ध्वनि प्रदूषण नियंत्रणासाठी कोणते उपाययोजना घेणार आहेत याबाबत माहिती विचारली. प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात अत्यंत आधुनिक

सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे व ध्वनि उत्पन्न करणा-या सयंत्रणेस एनक्लोझर बसविण्यात येणार आहेत व ध्वनि उत्पन्न होणा-या कार्यक्षेत्रातील कामगारांना इअर प्लग्स पुरविण्यात येतील. त्यामुळे ध्वनि प्रदूषणाचा कुठलाही दुष्परिणाम होणार नाही.

११) **श्री युवराज शिंदे, राहणार-अंतवडी, तालुका-कराड, जिल्हा-सातारा:-**

- श्री शिंदे यांनी मत प्रदर्शित केले की सदरहू प्रकल्पाच्या विस्तारिकरणास आमची हरकत नाही. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी झाडे लावा झाडे जगवा ही योजना राबविली आहे. ती भविष्यातही तशीच चालू ठेवावीअशी मागणी केली. विस्तारवाढीस आमची हरकत नाही असेही मत त्यांनी मांडले.

१२) **श्री भीमराव इंगवले, राहणार- रिसवडगाव, तालुका-कराड, जिल्हा-सातारा, माजी चेअरमन, कृषि सोसायटी, रिसवडगाव:-**

- श्री इंगवले यांनी सांगितले की येथून चार कि.मी.. आमचं गाव आहे. प्रकल्पाचा व हवा प्रदूषणाचा कधीही त्रास झालेला नाही. कारखान्याचे प्रशासन चांगले असल्याने व दर चांगला, म्हणूनसभासद ऊस देण्यास उत्सुक असतो. पण गाळप क्षमता कमी असल्याने शेतक-यास १८-१९ महिने ऊस देण्यास थांबावे लागते.विस्तारिकरणामुळे ती दूर व्हावी हीच इच्छा आहे. या विस्तारिकरणास आमचे अनुमोदन आहे.

१३) **श्री नारायण अप्पाजी जाधव, माजी सरपंच, तासवडे गाव, तालुका-कराड, जिल्हा-सातारा:-**

- श्री.नारायण जाधव यांनी मत प्रदर्शित केले की प्रकल्प प्रवर्तकांनी पहिल्यापासूनच पर्यावरणाची काळजी घेतलेली आहे.पर्यावरण संरक्षण व संवर्धनाची योग्यप्रकारे काळजी घेत आहेत. तरी प्रकल्पास मान्यता प्रदान करण्यात यावी.
- सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी असे मत प्रदर्शित केले की उपस्थितांकडून नोंदविण्यात आलेल्या सूचनांवरुन असा निष्कर्ष काढण्यात येतो की प्रकल्पाच्या विस्तारिकरणास स्थानिकांचा पाठिंबा आहे. मात्र उपस्थितांपैकी कोणाला सदरहू विस्तारिकरण प्रकल्पाबाबत त्यांचे काही पर्यावरणीय आक्षेप, सुचना, टिकाटिप्पणी असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कुठलाही प्रतिसाद नव्हता.
- अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनीप्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात पर्यावरण सर्वेषण घेण्यात आले, त्या

परिसरात कुठल्या कुठल्या सामाजिक योजनांसाठी किती खर्च करणार याबाबत विचारणा केली व सदरहू सामाजिक योजनांसाठीचा संपूर्ण खर्च बैठकीत किंवा त्यानंतर स्थानिकांना उपलब्ध करुन देण्याचे आवाहन केले. प्रकल्प प्रवर्तक यांनी सदरहू माहिती काही वेळेनंतरच स्थानिकांना करुन देता येऊ शकेल उपलब्ध करण्याची विनंती केली.

- प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की नियमांप्रमाणे पुढील पाच वर्षात सुमारे दोन कोटी पंचवीस लाख रुपये सामाजिक बांधिलकी म्हणून खर्च करावे लागू शकतील अशी माहिती दिली.
- अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती सदरहू प्रस्तावित सामाजिक योजनांबद्दलची सर्व माहिती स्थानिकांना उपलब्ध करुन देण्याची सूचना केली.
- श्री खेडकर, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की आताच पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की दोन कोटी पंचवीस लाख रुपये प्रकल्प प्रवर्तक सामाजिक बांधिलकी म्हणून परिसरात खर्च करणार आहेत. शिवाय प्रदूषण नियंत्रणासाठी जो खर्च करणार आहेत, तो मोठा आहे. तो रुपये ५०/- कोटी खर्च करणार आहेत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी मप्रनि मंडळाचा प्रतिनिधी म्हणून उपस्थितांना माहिती दिली की, आता मानके ही कठोर (stringent) होत आहेत. प्रकल्प प्रवर्तक हवा प्रदूषण टाळण्यासाठी ईएसपी सयंत्रणा कार्यान्वित करणात आहेत. तर औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेत इव्हॅपोरेटर बसवून सांडपाणी/स्पेंट वॉश घट्ट करुन ते बॉयलरमध्ये जाळण्यात येणार आहे. हा प्रकल्प झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. त्यांनी मप्रनि मंडळाकडून उपस्थितांना ग्वाही दिली की कठोर मानके पाळण्याचे प्रकल्प प्रवर्तकांना बंधनकारक करण्यात येईल. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे विविध पर्यावरण कायद्यांतर्गत कडक अटी व शर्ती विविध उद्योगांना लागू करत असते, जेणेकरुन प्रकल्पातील प्रक्रियेमुळे परिसरातील जनतेस व निसर्गाचे नुकसान होऊ नये. प्रकल्प प्रवर्तक आधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित करणार असून सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण/झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

बैठकीचा समारोप करतानासमन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती कुठलाही निर्णय घेत नसते. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली

असून इतिवृतान्तात त्याचा समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने, हवामानबदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. सदरहू तज्ज्ञ समिती प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्रदान करण्याबाबत पुढील कार्यवाही करेल.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी उपस्थित केल्याबद्दल त्यांचे आभार मानले व बैठकीचे कामकाज पूर्ण झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**(सुनील थोरवे)**

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीतथा

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा, जिल्हा - सातारा

**(दिलीप खेडकर)**

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती तथाप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे

**(बाबासाहेब कुकडे)**

समन्वयक,पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सातारा